# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** सिंधखेड राजा
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0087 **Year (वर्ष):** 2023
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/05/2023 02:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 11/05/2023
      **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/05/2023
      **Time From (वेळेपासून):** 15:30 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:46 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 12/05/2023 **Time (वेळ):** 02:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 002
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/05/2023 02:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सिंदखेड राजा

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नारायण लक्ष्मण काळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 31/05/1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | Sindkhed Raja,सिंघखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | सिंदखेड राजा ,सिंघखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | सिंदखेड राजा ,सिंघखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जितेंद्र शालीग्राम बेहेरे | | | 1. 08,नकाने रोड ,श्रध्दा हाउसिंग सोसायटी ,धुळे,धुळे,देवपूर,धुळे, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नारायण लक्ष्मण काळे, वय 40 वर्ष, व्यवसाय शेती रा. वार्ड क्र. 3, सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा जि. बुलडाणा, मो.नं. 7420961078

समक्ष फिर्याद देतो की, मी वरीलप्रमाणे असुन दर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो. माझे शिक्षण 10 वी पर्यंत झालेले आहे. मला मराठी व हिंदी भाषा लिहीता वाचता येते.

मी, दिनांक 11.05.2023 रोजी श्री. चौधरी साहेब, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांना फोनद्वारे सांगीतले होते की, भुमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा येथील उपअधिक्षक श्री. बेहरे साहेब हे माझे आजोबांचे नावे असलेली मौजे सिंदखेडराजा गावठाणमधील प्लॉटचे मिळकत पत्रिकेवर माझे वडील व चुलत भाऊ यांची वारसाहक्काने नोंद घेण्यासाठी 6000/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत व त्यांनी सदर लाचेची रक्कम घेवुन दि. 11.05.2023 रोजी बोलाविले असल्याबाबत तक्रार दिली होती. तेव्हा श्री. चौधरी साहेबांनी मला सांगीतले होते की, ते सध्या इतर कारवाईमध्ये व्यस्त असल्याने ते पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे यांना पाठवतो.

त्यावरुन दिनांक 11.05.2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री सचिन इंगळे यांनी मला 15.30 वा. आसोला जहांगीर शिवारातील गायरान परीसरात बोलावून घेतले. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे यांचे सुचनेप्रमाणे मी सदर ठिकाणी हजर झालो. त्यावेळी तेथे हजर असलेले पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी स्वतः चा तसेच सापळा पथकातील इतर कर्मचारी तसेच पंचांचा परीचय करुन दिला. तसेच दोन्ही पंचापैकी पंच क्र 1 सुनिल सुमंतराव सातव व पंच क्र 2 म्हणुन रतनसिंग जयसिंग सोळंके असे नेमुन पोलीस निरीक्षक, श्री. सचिन इंगळे साहेब यांच्याकडे मी माझी लेखी तक्रार दिली ती पुढीलप्रमाणे- आमची सिंदखेडराजा गावठाण मध्ये पावणे दोन गुंठे जमीन माझे आजोबा स्व. किसन बयनाजी काळे यांच्या नावे आहे. माझे आजोबा मयत झाल्याने त्या जमिनीस माझे वडील लक्ष्मण काळे व माझे काका रामभाऊ काळे यांची नावे वारसाहक्काने वारसदार म्हणुन लागली आहे. माझे वडील यांनी माझे काका स्व. रामभाऊ काळे हे मयत झाल्याने त्यांचे मुले 1) भगवान रामभाऊ काळे 2) विष्णु रामभाऊ काळे यांच्या नावे सिंदखेडराजा येथील शिट क्र. 11 मध्ये प्लॉट क्र. 808 मध्ये 194.90 चौ.मी. क्षेत्र जागेच्या मिळकत पत्रिकेवर वारसाहक्काने नोंद घेण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा येथे अर्ज केला होता. माझे वडील श्री. लक्ष्मण काळे हे वयोवृध्द असल्याने त्यांनी दिलेल्या अर्जासंबंधाने मी आज दिनांक 11.05.2023 रोजी भुमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा येथे जावुन उपअधिक्षक श्री. बेहरे साहेब यांची भेट घेतली असता, माझ्या वडीलानी दिलेल्या अर्जावरून वारसाहक्क नोंद घेण्यासाठी मला श्री. बेहरे साहेब यांनी 6000/- रूपये लाचेची मागणी केली. ते मागणी करीत असलेले 6000/- रूपये हे कोणतीही शासकिय फी नसुन लाच आहे. श्री. बेहरे साहेब यांचा व माझा कोणत्याही प्रकारचा उसनवारीचा किंवा आर्थीक देवाण घेवाणीचा व्यवहार नसुन श्री. बेहरे उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा यांना माझेकडुन 6000/- रूपये लाच घेतांना पकडुन कायदेशिर कारवाई करावी ही विनंती.

वरीलप्रमाणे लेखी दिलेली तक्रार दोन्ही पंचाना वाचण्यास दिली व माझेकडुन तोंडी कथन करण्यात आली. त्यानंतर पंच क्र 1 सुनिल सातव यांनी त्यावर त्यांचे स्वहस्ताक्षरात शेरा मारून दोन्ही पंचानी त्यावर सहया केल्या आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे यांनी दोन्ही पंचाना तसेच मला पडताळणी पूर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवून सोबत आणलेल्या व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहीती देवुन त्याबाबतचा सविस्तर पडताळणी पूर्व पंचनामा केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सचिन इंगळे साहेब, यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझ्या गळ्यामध्ये लटकवुन देवुन मला पंच क्र 1 सुनिल सातव यांचे सह माझे खाजगी मोटार सायकलने भुमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा येथे लोकसेवक श्री. बेहरे, उपअधिक्षक, भूमी अभिलेख यांची 6000/- रूपये लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करीता दिनांक 11.05.2023 रोजी 16.40 वा. रवाना केले. त्यावेळी मी व पंच क्र 1 सुनिल सातव असे आम्ही दोघांनी माझे मोटारसायकलने उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा

येथे जावुन लोकसेवक श्री. बेहरे यांची भेट घेतली असता, आमचे बोलणी दरम्यान लोकसेवक श्री. बेहरे याना सकाळी बोललो होतो न मी तुम्हाला, त्यावर श्री. बेहरे यानी हं तं काय झाल मग असे म्हटले असता, मी त्याना त्यामध्ये आमचे वडील अन चुलत भाऊ आहेत तर काही कमी जास्ती करान, तुम्ही सहा हजार बोलले असता, त्यावर लोकसेवक म्हणाले की, सहा बोलली होती मी पाच दिन म्हणे मग म्हटलं आणा पाच, असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक याना चार असे बोलले असता, लोकसेवक मला म्हणाले की, नाही.. बोलण केल, बोलण केल, बिनधास्त शब्द देला तुम्ही मी बदलली का? तुम्हीच तोंडान बोलले की पाच देतो म्हणुन मी सहा बोलली त तुम्ही काय बोलले जाऊ दया असे लोकसेवक मला म्हणाले, त्यानंतर मी लोकसेवक याना कामाबाबत आजच होईल का? होईल ना साहेब असे विचारणा केली असता, लोकसेवक श्री. बेहरे यानी मला आजच्या आजच लगेच अर्ध्या तासात उतारा काढा असे म्हणाल्याने मी लगेच घेवुन देतो मग यावर लोकसेवक म्हणाले की, आणा लवकर, कारण मी थाबणार नाही. त्यावर मी बर म्हणालो. असे म्हणुन लोकसेवक श्री. बेहरे यानी मला पच क्रमाक 1 सुनिल सातव याचे समक्ष 5000/- रूपये लाचेची मागणी केल्याने मी त्याना लगेच पैसे आणुन देतो असे म्हणुन त्यावर लोकसेवक श्री. बेहरे हे असे म्हणाले की, देवुन टाकायचे अन पटकन मोकळ होवुन जायचं, अशाप्रकारे लोकसेवक श्री. बेहरे यानी मला 5000/- रूपये लाचेची मागणी केल्याने मी व पच क्रमाक 1 असे माझे मोटारसायकलने कार्यवाही पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा श्री. इगळे साहेब यानी व्हाइस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बद केले व त्यामध्ये झालेले संभाषण सर्वांसमक्ष व्हाईस रेकॉर्डर सुरू करून ऐकले, सदर संभाषणावरून व पंच क्र 1 याचे सागण्यावरून सापळा पथकातील सदस्याची खात्री झाली की, लोकसेवक श्री. बेहरे, उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा यानी मला पच क्र. 1 याच्या समक्ष 5000/- रूपये लाचेची मागणी केली असुन मी लगेच पैसे घेवुन येतो, असे सागीतले त्यावरून दिनाक 11.05.2023 रोजी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. इगळे यानी सागीतल्याप्रमाणे मी लाचेची रक्कम म्हणुन आणलेले 5000/- रूपये हजर केले. ज्यामध्ये 500/- रूपये दराच्या 10 नोटा हजर केल्या. सदर नोटाचे पोलीस निरीक्षक सचिन इगळे यानी पंचासमक्ष नबर नोंदवुन नोटाना ॲन्थ्रासिन पावडर लावुन प्रत्याक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर मी व पंच क्र 1 असे माझे मोटारसायकलने तसेच सापळा पथक हे सोबत आणलेल्या शासकिय वाहनाने सापळा कारवाई कामी रवाना झालो. त्यानुसार आम्ही सर्वजण सापळा कार्यवाहीकामी रवाना झाल्यानतर तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा पासुन काही अंतरावर पोलीस निरीक्षक श्री. सचिन इगळे यानी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून देवुन मला व पंच क्रमाक 1 सुनिल सातव याना माझे मोसा क्र एम.एच 20 बी.ई. 854 ने भूमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा येथे 17.41 वा. रवाना केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. इगळे साहेब सापळा पथकातील पोहेकॉ राजेंद्र क्षिरसागर, पोना जगदिश पवार, पोकॉ अझरूद्दीन काझी, मपोशि स्वाती वाणी तसेच पच क्र 2 चालक नापोशि, नितीन शेटे शासकीय वाहनाने सापळा कार्यवाही कामी लागणारे सर्व साहीत्यासह आमचे मोसा मागे भुमी अभिलेख कार्यालय, सिंदखेडराजा येथे आमचे पाठोपाठ निघाले. त्यावेळी आम्ही व कार्यवाही पथक असे भूमी अभिलेख- कार्यालय, सिंदखेडराजा परिसरात आलो असता, सापळा पथकातील सदस्य हे शासकीय वाहनातून उतरून परिसरातच त्याचे अस्तीत्व लपवुन उभे राहील्याची खात्री झाल्यानतर मी व पच क्र1 सुनिल सातव असे आम्ही भुमी अभिलेख कार्यालयाचे आवारात जावून लोकसेवक श्री. बेहरे याचे दालनात जावुन मी त्याना साहेब झाले का? असे बोललो असता त्यांनी मला नाही न. पाच हजार सांगीतले होते न आपण, त्यावर मी त्याना माझे टी शर्टच्या डाव्या बाजुचे खिशामधुन लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून लोकसेवक श्री. बेहरे याचे समोर धरली व म्हणालो की, सर हे पाच हजार, साहेब पाच हजार असे म्हणलो असता, त्यानी त्याचे डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारून ती रक्कम त्याचे पॅंटच्या डावीकडील खिशामध्ये ठेवली. त्यानतर त्यांनी मला माझ्या कामासबधीची वारसाहक्काची कागदपत्रे कर्मचारी धुसिंगे याच्या टेबलावर देवुन टाका आणि त्याना सागा हे साहेबानी करायचं सागीतलं आहे म्हणा, त्यावेळी मी त्याना बर म्हणून पोलीस निरीक्षक श्री
○गळे यानी सांगीतल्या प्रमाणे माझ्या गळ्यातील रूमाल तोंडावरून फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला असता पोलीस निरीक्षक श्री सचिन इगळे साहेब व कार्यालय परिसरात उभे असलेले सापळा पथकातील कर्मचारी तसेच पंच क्र 2 श्री. सोळंके असे लोकसेवक श्री. बेहरे याचे दालनात येवुन स्वतःचा व सापळा पथकाचा परीचय देवुन लोकसेवक श्री. बेहरे याना ताब्यात घेवून, लोकसेवक श्री. बेहरे याना त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव श्री. जितेंद्र शालीग्राम बेहरे, वय 49 वर्ष पद-उपअधिक्षक, भूमी अभिलेख, वर्ग-2, भुमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा रा. श्रध्दा सोसायटी घर क. 8. नकाने रोड, धुळे ता. जि. धुळे ह.मु. श्री. तायडकर याचे राहते घर, साईनगर सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा असे सांगितले. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री सचीन इगळे यांनी मला लोकसेवक यानी पैसे कुठे ठेवले आहे याबाबत विचारणा केली असता मी त्याना सांगीतले की, लोकसेवक श्री. बेहरे यानी माझेकडुन लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारून, त्याचे पॅंटच्या डाव्या बाजुचे

खिश्यात ठेवल्याचे सांगताच इंगळे साहेब यांचे सुचने वरुन पंच क्र 2 रतनसिंग सोळंके यांनी लोकसेवक श्री. बेहरे यांचे पॅटच्या डाव्या बाजुच्या खिश्यातून 500/- रुपये दराच्या 10 नोटा काढून घेवुन ते एकुण 5000/- रुपये असुन सदर नोटांचे क्रमांक हे पच क्र 1 श्री. सुनिल सातव यांचेकडे नोंद करुन ठेवलेले नोटांचे कमांक हे एकच असल्याची खात्री केली त्याबाबतचा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे.तरी आलोसे. श्री. जितेंद्र शालीग्राम बेहरे, वय 49 वर्ष, पद-उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वर्ग-2 यांनी माझे आजोबा यांच्या नावावर असलेल्या सिंदखेडराजा गावठाण मधील मिळकत पत्रिकेवर माझे वडील व चुलतभाऊ यांच्या नावाची वारसाहक्काने नोंद घेण्यासाठी 6000/- रूपये लाचेची मागणी करून पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती पच क्र 1 सुनिल सातव यांचे समक्ष 5000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आज दिनांक 11.05.2023 रोजी उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा यांचे दालनामध्ये 17.46 वा सुमारास स्विकारल्याने आलोसे, श्री. जितेंद्र शालीग्राम बेहरे, वय 49 वर्ष, पद-उपअधिक्षक, भूमी अभिलेख, वर्ग-2 भुमी अभिलेख कार्यालय सिंदखेडराजा रा. श्रध्दा सोसायटी घर क. 8. नकाने रोड, धुळे ता.जि. धुळे ह.मु. श्री. तांबेकर यांचे राहते घर साईनगर सिंदखेडराजा ता. सिंदखेडराजा जि.. बुलडाणा यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा होत असल्याने मी त्यांचे विरुद्ध कायदेशिर फिर्याद देत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Yuvraj Prallhad rathod
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत तपास फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची स्वाक्षरी/अंगठा):

15 **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Keshav Vitthal wagh

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(क्र.):